# सोलापूर महानगरपालिका
# निवडणूक कार्यालय
# प्रेस नोट

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये दि. १६ सप्टेंबर २०१६ ते १४ ऑक्टोबर २०१६ पर्यंत मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आलेले असून सदरच्या कालावधीमध्ये वाढ करण्यात आलेली असून ती २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत करण्यात आलेली आहे. तरी शहरातील नागरिकांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म ६ - नवीन नोंदणी, फॉर्म ७- मतदार यादीतील नावास आक्षेप घेण्यासाठी किंवा नांव वगळण्यासाठी, फॉर्म ८ - मतदार यादीतील आपल्या नोंदीच्या तपशीलामध्ये करावयाच्या दुरुस्तीसाठी, ८अ - मतदार यादीतील नोंदीचे स्थलांतर करण्यासाठी असे संबधित फॉर्म भरावे. फॉर्मसोबत फॉर्म कशाप्रकारे भरावयाचे याची मार्गदर्शक सूची दिलेली असून नागरीकांनी त्याचे अवलोकन करुन फॉर्म भरुन ते नजीकच्या मतदान केंद्रावर किंवा सोलापूर महानगरपालिकेतील १ ते ८ झोन कार्यालयामध्ये दि. २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत द्यावेत.

# मुख्य निवडणूक अधिकारी ,महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक :- ईएलआर २०१६/प्र.क्र.३५६ /१६/३३
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर , २०१६.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय- दि.१.१.२०१७ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या मुदतवाढीबाबत

संदर्भ-भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक २३/एमटी/२०१७ दि.१४.१०.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत भारत निवडणूक आयोगाच्या दि:१४/१०/२०१६ च्या पत्राची व आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि.१.१.२०१७ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती स्वीकारण्याची मुदत दि.२१.१०.२०१६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी आपण सर्व मतदार नोंदणी अधिकारी /सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांना अवगत करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना त्वरीत देण्यात याव्यात.तसेच यास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी. याशिवाय सदर बाब सर्व राजकीय पक्षांना अवगत करावी.

आपला,

(अ.ना.वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य.

प्रत- उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित